उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२७६ ■ गुरुवार ९ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.

१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

## अमेरिकेचा इराणचे परस्पर विरोधी हल्ले; शस्त्रसंधी संपुष्टात
## शेअर मार्केटमधील गुंतवणूकदारांचे आठ लाख कोटी बुडाले



**नवी दिल्ली, दि. ८ : अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात गेल्या काही दिवसांपासून क्रूड ऑईलच्या दरात घसरण सुरु होती. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचे जाहीर केले. अमेरिकेने इराणवर हल्ले केले. त्यानंतर इराणकडून कुवेत आणि इतर ठिकाणी हल्ले करण्यात आले. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईलच्या दरात वाढ झाली. आज ब्रेंट क्रूडचा दर ५.६ टक्क्यांनी वाढून ७८ डॉलर प्रति बॅरल झाला. तर कच्च्या क्रूड ऑईलच्या दरात ५.८ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली. त्याचा दर ७४.५५ डॉलर प्रति बॅरल झाला.**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या कर्मशिअल जहाजांवर इराणकडून हल्ले करण्यात आले होते. त्यानंतर अमेरिकेने इराणच्या ८० ठिकाणांवर हल्ले केले. अमेरिकेने इराणच्या एअर डिफेन्स सिस्टीम, किनारपट्टीवरील रडार नेटवर्क, अँटी शिप क्रूझ मिसाईल लाँच पॅडवर हल्ले केले. अमेरिकेने इराणच्या आयआरजीसीच्या ६० हून अधिक नौका देखील नष्ट केल्या. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तीन कर्मशिअल ऑईल टँकर जहाजांवर हल्ले झाले होते. ज्यामध्ये कतारचा झेंडा असलेल्या रेकय्यातचा समावेश होता. त्यावर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा हल्ला झाला होता. इराणने त्या हल्ल्यांची जबाबदारी घेतली नव्हती. मात्र, अमेरिकन गुप्तचर संस्थांनी इराणला जबाबदार धरत हल्ले केले. यामुळे आखाती देशांमधील तणाव पुन्हा वाढला आहे. इराणच्या जवळ असलेले कतार आणि बरहीन हे देश सतर्क झाले आहेत.

आठ लाख कोटी बुडाले

अमेरिकेनं इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचे जाहीर केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला तेल विक्रीचे दिलेले विशेष लायसन्स रद्द केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात जूनमध्ये एक करार झाला होता. त्या कराराद्वारे इराणला २१ ऑगस्टपर्यंत तेल विक्रीची परवानगी देण्यात आली होती. अमेरिकन ट्रेझरी विभागाकडून इराणला देण्यात आलेली तेल विक्रीची **(पान ४ वर)**

### कचऱ्याच्या ढीगाखाली पंधरा जण अडकलेत

पिंपरी, दि. ८ : पुण्यातील मोशी येथील कचरा प्रक्रिया (वेस्ट-टू-एनर्जी) प्रकल्प परिसरात बुधवारी दुपारी भीषण दुर्घटना घडली. मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा मोठा ढिगारा घसरून प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने इमारतीचा मोठा भाग जमीनदोस्त झाला. या दुर्घटनेत चौदा ते पंधरा कर्मचारी अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे.

घटनास्थळी अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस आणि इतर बचाव पथके दाखल झाली असून बचावकार्य सुरू आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि नदीपात्रांच्या पाणीपातळीत वाढ होणे अशा घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर **(पान ४ वर)**

## धरणातून पाणी सोडले नसतांना गोदावरीला पूर
## नाशिक परिसरात मुसळधार पाऊस, रस्ते जलमय


(छाया-वैभव मदाने)

नाशिक, दि.८ (प्रतिनिधी) - नाशिक शहर आणि परिसरात काल मध्यरात्रीपासून पावसाने जोरदार बॅटिंग सुरू केली असून, आज ( ८ जुलै ) सकाळपासून शहरात पावसाची संततधार कायम आहे. या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीला यंदाच्या पावसाळ्यातील हंगामातील पहिला पूर आला आहे. विशेष म्हणजे गंगापूर धरणातून अद्याप पाण्याचा विसर्ग करण्यात आलेला नसला, तरी केवळ पाणलोट क्षेत्र आणि शहरातील जोरदार पावसामुळे नदीची पातळी कमालीची वाढली असून रामकुंडावरील दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पाणी पोहोचले आहे. नंदीनी आणि दारणा या नद्यांना देखील पूर आला आहे. दरम्यान सातपूर , अंबड आणि सिडको परिसरात आजही पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचून घरे आणि दुकानात पाणी शिरले होते.

**रस्ते जलमय, वाहतूक कोंडी**

मध्यरात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे पाथर्डी फाटा परिसरातील ज्ञानेश्वर नगर आणि रामदेव नगर भागात पाणी साचले आहे. सातपूर परिसरातील शिवाजीनगर येथील विठ्ठल रुक्मिणी कॉलनीतील इमारतींच्या पार्किंगमध्ये पाणी शिरले आहे. तसेच दिंडोरी रोडवरील एका पेट्रोल पंपामागील वसाहतींमध्ये गुडघाभर पाणी साचल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे.

**जिल्ह्यात विक्रमी पाऊस**

नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण आणि घाटमाथा परिसरात पावसाचा जोर प्रचंड आहे. गेल्या काही तासांत आंबोलीमध्ये सर्वाधिक २०२४ मिमी, इगतपुरीत २०५ मिमी, त्र्यंबकेश्वरमध्ये १४८ मिमी आणि **(पान ४ वर)**

## पिंपळनेर जवळ टँकर मधून गॅस सिलेंडर भरतांनाचे रॅकेट पकडले



**धुळे, दि. ८ - पिंपळनेर (ता. साक्री) येथील दहीवेल मार्गावर राजस्थानी बालाजी हॉटेल जवळ मंगळवारी (ता.७) मध्यरात्री अकराच्या सुमारास महसूल विभाग व पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाई केली. टँकर मधील गॅस अवैधरीत्या सिलेंडर मध्ये भरून काळ्या बाजारात हॉटेल व अन्य व्यवसायिकांना विक्री करणारे रॅकेट उघडकीस आले. याप्रकरणी ८३ लाख ३५ हजार ७४४ रुपयांचे साहित्य जप्त केले असून पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**

भारत पेट्रोलियमचा गॅस टँकर, तीन जीप, १०५ व्यावसायिक गॅस सिलेंडर, गॅस भरण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून,या रॅकेटचे धागेदोरे महाराष्ट्रासह गुजरातपर्यंत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

महसूल विभाग व पोलीस प्रशासनाला गुप्त माहिती मिळाली. त्यामाहितीच्या आधारे पिंपळनेर येथील अपर तहसीलदार अधिकार पेंढारकर यांच्या नेतृत्वाखाली पुरवठा निरिक्षक अधिकारी विशाल कांगणे (साक्री),जयवंत पाटील, भारत देसले, सुभाष गिरी, गणेश माळी, विकास पाटील, मुकेश विसपुते, सर्व महसुली सहाय्यक, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र मोरे, सहाय्यक उपनिरीक्षक अशोक पवार, हवालदार **(पान ४ वर)**

## धुळ्यात कागदपत्रे नसतांना लाखोंची वाहने आढळली; एलसीबीची कारवाई


**धुळे, दि.८ - येथील चाळीसगाव रोड परिसरात अक्सा पार्क जवळ एका संशयिताच्या ताब्यात दोन कार सह बुलेट अशी तेरा लाखांची वाहने मिळाली. वाहनाची कुठली कागदपत्रे नसून ती अवैधरित्या ताब्यात ठेवल्याची आढळले. संशयीताविरुद्ध मोहाडी पोलिसात गुन्हा दाखल झाला.**

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी (ता.७) दुपारी साडेतीनच्या सुमारास पाहणी केली.

या कारवाईत महंमद अत्ताउल्लाह अस्लम खान (४२, रा. भंगार बाजार, सॉ मीलजवळ, चाळीसगाव रोड, धुळे) याच्या ताब्यात संशयास्पद स्थितीतील वाहने आढळली. चौकशीअंती पोलिसांनी वाहने जप्त केली, त्यात सात लाख रुपये किंमतीची महिंद्रा थार (पीबी १०/एचएस ८१८३), पाच लाख रुपये किंमतीची मारुती ब्रेझा (एएस १२/यू ९१९९), एक लाख रुपये किंमतीची बुलेटचा समावेश आहे. या सर्व वाहनांची किंमत १३ लाख रुपये आहे. पोलिसांनी केलेल्या चौकशीत **(पान ४ वर)**

### हनुमंत गायकवाड आज कार्यभार घेणार

नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी) - येथील उपविभागीय पोलीस



अधिकारी कार्यालयाचा कार्यभार हनुमंत गायकवाड हे आज घेणार आहेत. हनुमंत गायकवाड हे यापूर्वी उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे कार्यरत होते, गायकवाड यांच्याकडे पुसद जिल्हा यवतमाळ येथील उपविभागीय कार्यालयाचा ही कार्यभार होता. शासनाने त्यांची पदस्थापना नंदुरबार उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून केल्यानंतर गायकवाड हे आज कार्यभार घेत आहेत. अत्यंत **(पान ४ वर)**

## नगराध्यक्षांना वित्तीय अधिकार द्यावे आ.रघुवंशींची वि. परिषदेत मागणी

**नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी)- नगराध्यक्षांचे धनादेशावर स्वाक्षरी करण्याच्या अधिकार राजकीय भावनेतून काढून टाकण्यात आले आहेत.लोकप्रतिनिधीच जर लोकप्रतिनिधींचे अधिकार कमी करत आहेत असा खेद आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी व्यक्त करीत पूर्वीप्रमाणेच नगराध्यक्षांना धनादेशांवर सह्यांचा अधिकार देण्यात यावा अशी मागणी विधान परिषदेत केली.**

नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या अध्यक्षांना यापूर्वी चेक वर सही करण्याचे अधिकार होते.ते बंद झाले. ते अधिकार पुन्हा देण्यात यावे यासाठी भाजप आ.डॉ राजीव पोतदार यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडली त्यावेळी त्यांना आ.चंद्रकात रघुवंशी यांनी पाठिंबा दर्शवला.

यावेळी आ. चंद्रकांत रघुवंशी म्हणाले,नगरपालिका ज्यावेळेस स्थापन करण्यात आल्या तेव्हापासूनच नगराध्यक्षांचा अंकुश मुख्याधिकाऱ्यांवर आहे. धनादेशांवर स्वाक्षऱ्या करण्याच्या अधिकार नगराध्यक्षांना होते. त्यानंतर २०१५ **(पान ४ वर)**


### अल्पवयीन मुलीशी लग्न पाच जणांवर गुन्हा दाखल

धुळे, दि.८ - चिपलीपाडा (पो. घोडदे, ता. साक्री) येथील अल्पवयीन मुलीचा विवाह केल्याप्रकरणी साक्री पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

चिपलीपाडा गावात १५ जूनला बालविवाह झाला. या संदर्भात माहिती घाणेगावचे ग्रामपंचायत अधिकारी नामदेव महारु कलगुंडे यांना मिळाली. याबाबत चौकशी केली असता गावातीलच एका मुलाचा १५ वर्ष ८ महिने वयाच्या युवतीशी विवाह झाल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी कलगुंडे यांनी मंगळवारी साक्री पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार सुभाष झिपा ठाकरे, निर्मलाबाई झिपा ठाकरे, गुलाबसिंग गुलसिंग **(पान ४ वर)**

### आ.अनुप अग्रवालांची लक्षवेधी
## धुळ्यासह राज्यात फोफावला संघटीत लँड जिहाद राज्यातील प्रकरणांची चौकशी करु- ना.बावनकुळे

**धुळे, दि..८ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ मधील कलम ६३ व कलम ८४-सीचा हेतू कृषी जमीन केवळ पात्र शेतकऱ्यांकडेच राहावी असा असताना धुळे शहरातील देवपूरसह तालुक्यातील वडजाई, पिंपरी, नरव्हाळ परिसरात या कायद्याचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत. हा लँड जिहादचा प्रकार फक्त धुळे शहर, तालुक्यापुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण**



**महाराष्ट्रभर फोफावला आहे. या गंभीर प्रकरणाची शासनाने त्वरित दखल घेऊन या संघटित गुन्हेगारीविरुद्ध कडक पावले उचलावीत, शासनाची फसवणूक करणाऱ्या या प्रकरणांची एसआयटीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी आज शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी केली.**

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबईत सुरू असून, आज आमदार अग्रवाल यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे आज राज्य शासनासह संपूर्ण सभागृहाचे लक्ष या गंभीर प्रकाराकडे वेधले.

आमदार अग्रवाल यांनी सांगितले, की या प्रकरणांमध्ये शेतकरी नसताना बोगस शेतकरी दाखले तयार करणे, खोटे ७/१२ उतारे जोडणे, इतर राज्यांतील जमिनीचे उतारे महाराष्ट्रातील शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून वापरणे, **(पान ४ वर)**

### पुनरिक्षणाच्या कामात शहर पो. गुन्हा दाखल

धुळे, दि.८ - भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (एसएसआयआर) अभियान कामकाजात हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले, याप्रकरणी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

धुळे शहर विधानसभा मतदारसंघातील भाग क्रमांक १५५ (कृष्णनगर-मोगलाई) येथे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून शिवाजी हायस्कूल, कृष्णनगर, मोगलाई, साक्री रोड, धुळे येथील उपशिक्षक रमाकांत पुंडलिक देसले यांची नियुक्ती करण्यात आली होती. मतदार यादी **(पान ४ वर)**

## शिवाजी पुतळ्याजवळ खड्ड्यात बसून मनपा प्रशासनाच्या विरोधात आंदोलन



**धुळे, दि.८ - शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, श्रीराम पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून मोठमोठे खड्डे पडले आहेत. गेल्या एक-दोन दिवसांतील तुरळक पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांची तीव्रता वाढली असून, या ठिकाणी लहान-मोठे अपघात घडत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.**

आज पहाटेपासून झालेल्या रिमझिम पावसामुळे खड्डे पूर्णपणे पाण्याखाली गेले. त्यामुळे सकाळी शाळेत जाणाऱ्या काही विद्यार्थ्यांना खड्ड्यांचा अंदाज न आल्याने ते घसरून पडले व त्यांना किरकोळ दुखापती झाल्या. तसेच अनेक दुचाकीस्वारांच्या मोटारसायकली खड्ड्यात अडकल्याने बंद पडल्या, तर काही वाहनचालक घसरून पडल्याने त्यांच्या कपड्यांसह साहित्यही भिजले.

या प्रकाराचा निषेध करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र पांडुरंग गायकवाड यांनी आज दुपारी संबंधित खड्ड्यात बसून प्रतीकात्मक आंघोळ करत महापालिका प्रशासनाविरोधात अनोखे आंदोलन केले. रस्त्याच्या मध्यभागी झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाली.

यावेळी उपस्थित अनेक नागरिकांनी गायकवाड यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत, शहरातील धोकादायक खड्डे तातडीने बुजवून नागरिकांना सुरक्षित रस्ते उपलब्ध करून देण्याची मागणी महापालिका प्रशासनाकडे केली.

## आदर्श नगरात पावसाचे पाणी घुसले नगराध्यक्ष जाधवांची तात्काळ कारवाई

**नवापूर, दि.८ (प्रतिनिधी) - नवापूर शहरात गेल्या दोन दिवसांपासून समाधानकारक पाऊस सुरू असून अनेक भागांत पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील आदर्श नगर व डिगंबर पाडवी सोसायटी परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने नागरिकांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव यांच्याशी संपर्क साधून समस्या मांडली.**

तक्रारीची गंभीर दखल घेत नगराध्यक्ष जयवंत जाधव यांनी तत्काळ संबंधित परिसराला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. पाहणीदरम्यान नेशनल हायवेच्या गटार लाईनमध्ये बांधकाम साहित्य, माती व कचरा साचल्यामुळे गटार चोक झाल्याचे निदर्शनास आले. त्यांच्या उपस्थितीत तातडीने यंत्रसामग्रीच्या सहाय्याने गटारातील अडथळे हटविण्यात आले व गटार लाईन पूर्ववत सुरळीत करण्यात आली. गटार मोकळे होताच परिसरातील साचलेल्या पावसाच्या पाण्याचा वेगाने निचरा झाला. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा



मिळाला. नगराध्यक्ष जयवंत जाधव यांनी पावसाळ्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी संबंधित यंत्रणेला गटारींची नियमित स्वच्छता व देखभाल करण्याच्या सूचना दिल्या. नगराध्यक्षांनी केलेल्या तत्पर कार्यवाहीबद्दल आदर्श नगर व डिगंबर पाडवी सोसायटी परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत आभार मानले.

### नंदुरबारात जन आक्रोश मोर्चाला परवानगी नाकारली

नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी) - नंदुरबार शहरात प्रस्तावित जन आक्रोश मोर्चाला प्रशासनाने परवानगी नाकारल्यानंतर वातावरण काही काळ तणावपूर्ण झाले. मोर्चासाठी कार्यकर्ते व नागरिक मोठा मारुती मंदिराजवळ एकत्र जमले असता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी बंदोबस्त वाढवला.

मोर्चा काढण्याचा प्रयतक करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी अडवून ताब्यात घेतले. परिस्थिती नियंत्रणात ठेवत कोणताही अनुचित प्रकार घडू दिला नाही.

पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, **(पान ४ वर)**

## उ. महा.खान्देश विकास मंडळ संचलित अहिराणी भाषा संवर्धन पुरस्कार जाहीर




**साक्री, दि.८ (प्रतिनिधी)- उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळ व जागतिक अहिराणी भाषा संवर्धन परिषदेतर्फे दरवर्षी अहिराणी भाषेचे जतन व संवर्धन करणारे अहिराणीतील साहित्यिक, डिजिटल माध्यमात अहिराणीचा प्रचार व प्रसार करणारे कलावंत, अहिराणी भाषा संवर्धनाच्या चळवळीत कार्यरत संघटक ,अहिराणी साहित्याला प्रसिद्धी देणारे प्रकाशक अशा मान्यवरांना दरवर्षी भाषेच्या सक्षमीकरण समृद्धी व संपन्नतेच्या कार्यासाठी अनुक्रमे जीवनगौरव पुरस्कार; महाराजा सयाजीराव गायकवाड भाषा संवर्धक पुरस्कार; डॉ. दा.गो.बोरसे पुरस्कार अशा पुरस्कारांनी दरवर्षीच्या रिमझिम कवी संमेलनात सन्मानित करण्यात येते.**

त्या नुसार सन २०२६ चा जीवनगौरव पुरस्कार कापडणे जि.धुळे येथील ज्येष्ठ अहिरानी साहित्यिक रामदास वाघ यांना जाहीर करण्यात आला आहे. अहिरानी संवर्धन चळवळीत योगदान देणारे सेवानिवृत्त प्राचार्य विकास पाटील यांना महाराजा सयाजीराव गायकवाड भाषा संवर्धक पुरस्कार जाहीर झाला आहे. अहिराणी साहित्यात लक्षणीय योगदान देणारे डॉ बापूराव देसाई (नाशिक), ज्ञानेश्वर भामरे (वाघाडी ता शिरपूर) यांना तर डिजिटल माध्यमातून अहिराणीचा प्रचार व प्रसार करणाऱ्या सौ .कविता पाटील (कासारखेडे - ता यावल) यांना दा . गो . बोरसे पुरस्कार जाहीर झाला.

या पुरस्काराचे वितरण शनिवार वार दि.१८ जुलै रोजी मराठा विद्याप्रसारक संस्थेचे राजर्षी शाहू महाराज सभागृह, गंगापूर रोड, **(पान ४ वर)**

## राम मंदिर दानपेटीतील चोरीच्या निषेधार्थ नंदुरबारमध्ये उबाठा पक्षाची महाआरती



नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी) -अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरात झालेल्या चोरीच्या घटनेच्या निषेधार्थ जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नंदुरबार येथील नेहरू चौकातील श्रीराम मंदिरात महाआरती करण्यात आली. यावेळी चोरी करणाऱ्यांवर कडक कारवाई करून त्यांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी करण्यात आली.

अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मंदिरात झालेली चोरी ही संपूर्ण हिंदू समाजाच्या भावना दुखावणारी घटना आहे. या प्रकरणाच्या निषेधासाठी शिवसेना उबाठा पक्ष आक्रमक झाला आहे.

या प्रकरणाच्या निषेधार्थ आज दिनांक ७ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता नेहरू चौकातील राम मंदिर येथे महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख पंडित माळी, युवासेना जिल्हाधिकारी सागर पाटील, उपजिल्हाप्रमुख डॉ हेमंत शर्मा ,महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख सोनल चव्हाण ,जिल्हा संघटक **(पान ४ वर)**

## शहादा न.पा सभागृहाची दुरवस्था रंगरंगोटी व दुरुस्तीची सर्वांना अपेक्षा



शहादा, दि.०८(का.प्र.) - नगरपालिकेचा सुमारे साडेचार वर्षांचा प्रशासकीय कार्यकाळ संपल्यानंतर गत सहा महिन्यांपूर्वी पालिकेवर लोकनियुक्त नगराध्यक्षांसह नवीन नगरसेवकांची बॉडी विराजमान झाली आहे. नवीन बॉडीने पदभार स्वीकारल्यानंतर आतापर्यंत ४ ते ५ बैठकाही पार पडल्या. मात्र ज्या सभागृहात शहराच्या विकासाचे धोरणात्मक, विकासात्मक आणि आर्थिक निर्णय घेतले जातात, त्या कै. काशिनाथ सजन पाटील सभागृहाची सद्यस्थितीत प्रचंड दुरवस्था झाली **(पान ४ वर)**

हार्दिक अभिष्टचिंतन..!

शिवकुमारजी डोंगरे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा
: शुभेच्छूक :
डॉ.नैनेश देसले
गजानन कोतकर
डॉ.अमित चौधरी
राहुल सोनवणे
कपिल तनेजा
मिलींद मुडावतकर
स्वप्निल कोतकर
जुग्गी शेठ
डॉ.राजकिरण पटेल
छत्रपाल भदाणे
गजानन ग्रुप, धुळे

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,000 रु.+3% GST
चांदी- 2,27,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## एस आय आर प्रक्रियेतून मोठ्या गोंधळाची स्थिती

सध्या देशभर एस आय आर ची चर्चा सुरू आहे.त्यातल्या अनेक गमती जमती ऐकायला,वाचायला मिळत आहेत. अनेक मतदार असलेले नागरिक मतदार यादीतून काढून टाकल्याने त्यांच्या समोर नागरिकत्वाचा मुद्दा आहे.कदाचित देशाबाहेर जाण्याचा प्रसंग येऊ शकतो.अनेक वर्षे देशात वास्तव्य असताना त्यांना परकीय ठरविले जात आहे.या प्रक्रियेत विशिष्ट लोकांनाच लक्ष केले असल्याने लोकांची नाराजी आणि राग दोन्ही आहेत.एकंदरच ही मोहीम शंकास्पद ठरली असली तरी सत्तेपुढे शहाणपण चालत नाही म्हणून लोक सध्या चूप बसलेले आहेत.ही मोहीम आता बंगाल नंतर महाराष्ट्रात सुरू झाली असून या कामात हुकुमी म्हणून शिक्षकांना जुंपले आहे.

सरकारी कामांची गणती नाही एवढी कामे शिक्षकांकडून कडून करून घेण्यात येतात. अगदी जनावरांची खानेसुमारी देखील शिक्षकांकडून करून घेण्यात येते. एक महिन्याच्या आत नोंदणी पूर्ण झाली पाहिजे असा त्यांना आदेश आहे. परंतु या शिक्षकांकडे याद्यांचे गठ्ठे,दोन्ही हातात दोन पिशव्या गच्च भरलेल्या आहेत.त्या घेऊन शिक्षक वस्तीत घुसतात.नाव विचारणे, घरातील मतदारांचे फॉर्म भरून घेणे.त्यांचे फोटो आधार कार्ड जमा करणे,सह्या घेणे यात एकाच घरात त्यांचा किमान अर्धा ते पाऊण तास खर्ची पडतो. फोटो नसतील तर ते घेण्यासाठी आणखी संबंधितांकडे जावे लागते. वस्तीत सारेच यादी प्रमाणे सापडतील असे नाही. मग पुन्हा त्यांच्याकडे जाऊन नोंदी घेणे भाग पडते. असे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न असताना एक महिन्यात हे काम पूर्ण होणे शक्य नाही.आणखी मुदत वाढवावी लागणार तोवर शाळेतील कामाचे तीन तेरा वाजलेले असतील. एवढे करूनही समग्र मतदारांची नावे पुनरिक्षणानंतर यादीत येतीलच याचि काही भरवसा नाही. एखाद्या नागरिकाची ओळख त्याच्या जीवनातून, समाजातून आणि इतिहासातून निश्चित होईल की केवळ सरकारी कागदपत्रांवरून असा या प्रक्रियेतील महत्त्वाचा मुद्दा आहे.

ज्येष्ठ पत्रकार आर. राजगोपाल यांचे प्रकरण या संदर्भात ऐरणीवर चे आहे. जेव्हा पासपोर्ट, आधार आणि मतदार ओळखपत्र देखील नागरिकत्वाचे पुरेसे पुरावे मानले जात नाहीत, तेव्हा चिंता केवळ एका व्यक्तीची नसते, तर ज्यांची ओळख कागद पत्रावरून निश्चित केली जाते त्या प्रत्येक नागरिकाची ही चिंता आहे.कोलकात्याच्या प्रसिद्ध सत्ताविरोधी इंग्रजी दैनिक मद टेलिग्राफफ्चे माजी संपादक–पत्रकार आर. राजगोपाल यांची वेदना याबाबत फार गंभीर आहे. राजगोपाल यांची व्यथा तशी बरीच चर्चेत आलेली आहे.पश्चिम बंगालमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये एसआयआरफ्अंतर्गत ज्या लाखो लोकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली होती, त्यामध्ये एक नाव राजगोपाल यांचेही होते. यामुळे त्यांच्या पासपोर्टचे नूतनीकरण होऊ शकले नाही. देशाचे नागरिक असूनही राजगोपाल यांना नवीन पासपोर्ट आपले नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी पाहिजे नव्हता. तर त्यांना त्यांच्या पत्रकार मुलीच्या लग्नात सामील होण्यासाठी सॅन फ्रान्सिस्कोला पोहोचायचे होते. नूतनीकरण केलेल्या पासपोर्टसाठीचे त्यांचे सर्व अर्ज फेटाळण्यात आले. कारण २००२ च्या मतदार यादीत त्यांचे नाव आढळले नाही किंवा त्यांच्या वडिलांचेही. नव्हते. राजगोपाल यांचे वडील एक गांधीवादी, सेवानिवृत्त प्राध्यापक आणि केरळमधील गांधी स्मारक निधीचे राज्य सचिव होते. त्यांचे २०१६ मध्ये निधन झाले .

१५० कोटींच्या भारत देशात केवळ १२–१३ कोटी लोकांकडेच पासपोर्ट आहे. म्हणजेच १०० लोकांमध्ये केवळ ८ किंवा ९ लोकांकडे एवढेच त्यांचे प्रमाण आहे. असे असूनही एका संपादकासोबत भयंकर कसे घडू शकते, ही मनोरंजक कहाणी आहे.

कोट्यवधी लोकांकडे कोणतीही कागदपत्रे नाहीत, अशा लोकांच्या व्यथेची केवळ कल्पनाच केली जाऊ शकते. कायदेशीररित्या पाहिल्यास पासपोर्ट देखील केवळ एका प्रवासासाठीचा दस्तऐवज आहे, स्वतःला देशाचा नागरिक सिद्ध करणारे प्रमाणपत्र ते ठरू शकत नाही.केवळ पासपोर्टच नाही आधार कार्ड, मतदान आयडी, पॅन कार्ड किंवा रेशन कार्ड देखील देशाचा नागरिक असण्याचा कायदेशीर दस्तऐवज मानला गेलेला नाही. भारताचे वैध नागरिक असण्याच्या किंवा बनण्याच्या कायदेशीर अटी १९५५ च्या दस्तैवजात वर्णन केलेल्या आहेत. सध्याचे सरकार त्याच अटींचे काटेकोरपणे पालन करून घेऊ इच्छित आहे.जे काही सुरू आहे ते पाहून आणि समजून घेऊन भीती वाटली पाहिजे अशी स्थिती आहे.काही निवडक नागरिकांना किंवा समुदायांना त्रास देण्यासाठी सगळा आटापिटा सुरू आहे का अशी शंका निर्माण होणारी ही प्रक्रिया आहे. ज्याला कायदेशीर किंवा घटनात्मकदृष्ट्या योग्य ठरवले जाऊ शकेल का ,किंवा नागरिकांचे संपूर्ण लक्ष वास्तवापासून भरकटवण्यासाठी हा एखादा कट आहे का अशीही शंका लोकांच्या मनात आहे.

दरवर्षी लाखो सुशिक्षित आणि सक्षम लोक भारताचे नागरिकत्व सोडून परदेशात स्थायिक होण्यासाठी का जात आहेत, याबद्दल सरकारला अजिबात चिंता दिसत नाही. काहीतरी तर कारण असेल की ते लोक बाहेर गेले आहेत पण परत येऊ इच्छित नाहीत आणि जे इथे आहेत ते जात आहेत. या जाणाऱ्यांना सरकार रोखत नाही.व्यवस्थेने स्वतःला इतके अधिकार संपन्न करून घेतले आहे की, ती केवळ नवीन पासपोर्ट जारी करण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देऊ शकत नाही, तर जन्मापासून देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या भारतीयत्वाला आव्हानही देऊ शकते. संबंधित व्यक्ती भारताचा नागरिक आहे, हे त्याला स्वतःलाच कायद्यांच्या आधारावर सिद्ध करावे लागेल.

जर अशी परिस्थिती निर्माण झाली तर काय होईल, जेव्हा लाखो–कोट्यवधी देशवासीयांना भारताचे वैध नागरिक मानण्यास नकार दिला जाईल. इतकेच नाही तर यामध्येही एक मोठी संख्या अशा अल्पसंख्याकांची असेल ज्यांना धर्मांध सत्ता आपले नागरिक मानण्यासच नकार देते, त्यांच्या प्रतिनिधींना संसद आणि विधानसभांमध्ये पाठवत नाही. अशा सर्व लोकांना त्यांच्याच देशात निर्वासित घोषित केले जाईल की काय अशी भीती निर्माण झालेली आहे. निर्वासितांना जगण्याचा अधिकार असेल, पण ते मतदान करून सरकार निवडू शकणार नाहीत, उमेदवार बनू शकणार नाहीत. परदेश प्रवास करू शकणार नाहीत. राजगोपाल यांच्याप्रमाणे आपल्या मुलांना भेटू शकणार नाहीत.धर्माच्या आधारावर झालेल्या फाळणीनंतर, देशाला आता एखाद्या नवीन फाळणीकडे नेले जात आहे काय असेही प्रश्न लोकांच्या मनात निर्माण झालेले आहेत.

## मागासवर्गीय वित्त आणि विकास मंडळ लाभासाठी अर्ज सादर करा- आवाहन

**धुळे, दि.७- महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात विविध कर्ज व अनुदान योजना राबविण्यात येत असून, या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे, धुळेचे जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.**

सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी धुळे जिल्ह्यास २० टक्के बीजभांडवल कर्ज योजनेत १८, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना १२५, १ लक्ष थेट कर्ज योजना १६०, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना ४९, गट कर्ज व्याज परतावा योजना ४४, तसेच महिला स्वयंसिद्धी कर्ज व्याज परतावा योजना ५० उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

१ लक्ष थेट कर्ज योजनेकरिता अर्जदाराचा सिबील क्रेडीट स्कोर हा किमान ५०० असणे बंधणकारक आहे. वरील योजनेचा लाभासाठी महामंडळाच्या :https:// msobcfdc.org/ या संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी करुन घ्यावी. अर्जदाराने स्वतःच्या जातप्रमाणपत्रातील नमूद जातीनुसार लागू असलेले महामंडळाच्या उपकंपनीमध्ये जाऊन आवश्यक असलेल्या मूळ कागदपत्रांच्या पीडीएफ प्रती पोर्टलवर अपलोड करावी. अर्ज स्विकारणची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन प्रणालीद्वारे आहे. यासाठी जिल्हा कार्यालयामध्ये प्रत्यक्ष संपर्क साधल्यास अर्जदाराला योग्य ते मार्गदर्शन दिले जाईल.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि.जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ए विंग, तळमजला, सिंचन भवनच्या मागे, साक्री रोड, धुळे येथे (दूरध्वनी क्रमांक ०२५६२-२७८४९७) वर संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक श्री.डोईफोडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.



## डॉ.विक्रांतबाबा मोरे मित्र परिवार यांच्यातर्फे नगरसेवक राऊ दिलीपराव मोरे यांच्यातर्फे गौशाळेस आर्थिक मदत

**नंदुरबार, दि.७ (प्रतिनिधी)- नंदुरबार नगरपरिषदेचे नगरसेवक श्री राऊ दिलीराव मोरे यांनी डॉ. विक्रांतबाबा मोरे मित्र परिवार यांच्यातर्फे चौपाळे येथील श्री अरिहंत गोसेवा सेवाभावी संस्था संचलित गौशाळेला छ हजारांची आर्थिक मदत देऊन गोसेवा कार्याला मोलाचा हातभार लावला. गौशाळेतील गोवंशाच्या संगोपन, चारा व इतर आवश्यक सुविधांसाठी ही मदत उपयोगी पडणार असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.**

समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा सेवाभावी संस्थांना सहकार्य केल्यास गोसेवा अधिक प्रभावीपणे करता येईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी श्री अरिहंत गोसेवा सेवाभावी संस्थेचे सचिव आकाश जैन, सदस्य विकीभाई जैन, व्यवस्थापक अरुण जैन तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने नगरसेवक राऊ दिलीराव मोरे यांचे आभार व्यक्त करण्यात आले. गोसेवा ही सामाजिक व धार्मिक दायित्वाची बाब असून भविष्यातही अशा सेवाभावी उपक्रमांना सहकार्य करण्याची भूमिका राऊ मोरे यांनी व्यक्त केली.

या वेळी दिपक जाधव, राजेश्वर तवर, गौरव पाटील, गौरव महिरे, विक्की मराठे, प्रसाद पाटील, कैलास देसाई, जयेश जाधव, भावेश ईशी,भूषण सोनपुरे, प्रफुल महिरे, जिगर सूर्यवंशी, आकाश जाधव, बंटी गुरव,प्रसाद साठे, आदि उपस्थित होते.

## जमीर अ.मुल्ला सर फाऊंडेशनतर्फे स्वेस उर्दू शाळेत मोफत वह्यांचे वितरण

**धुळे, दि.८ - आज, बुधवार, ८ जुलै २०२६ रोजी, स्वेस उर्दू पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका, सौ. सुफिया बानो साहेबा यांच्या अध्यक्षतेखाली एक छोटी पण व्यापक कार्यक्रम पार पडला.**

अध्यक्षपदासाठीचा प्रस्ताव श्री. रिद्वानुद्दीन सर यांनी मांडला, ज्याला खलिकुज़्मा सरांनी अनुमोदन दिला आणि अध्यक्षपदी निवड झाली. समारंभाची उद्दिष्ट्ये आणि ध्येये श्री. शकील अहमद सरांनी मुलांना आणि उपस्थितांना समजावून सांगितली. या समारंभात, ज़मीर अहमद मुल्ला सर फाऊंडेशनतर्फे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या अनाथ आणि गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले. हे वह्यांचे वितरण मुख्याध्यापिका, सौ. सुफिया बानो आपा साहेबा आणि फाऊंडेशनचे संस्थापक



श्री. हाजी अनीस अहमद साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या समारंभात कनिज़ फातेमा मॅडम, श्री. रिद्वानुद्दीन सर, सौ. सलमा मॅडम साहेबा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. समारंभाचे सूत्रसंचालन माननीय अकील अहमद सरांनी केले. शेवटी माननीय अशफाक अहमद सरांनी प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले व समारंभाची सांगता झाली.



## कृभको तर्फे शाळांना स्वच्छता साहित्याचे वाटप

नंदुरबार, दि.८ (प्रतिनिधी) -सहकार सप्ताह निमित्त कृभको या भारत सरकारच्या सहकार खात्यांतर्गत येणाऱ्या कृभको (कृषक भारती को-ऑपरेटिव्ह लिमिटेड) या राष्ट्रीय सहकारी संस्थाद्वारे जिल्हा परिषद शाळा व शिवशंकर विद्यालय दहिंदुले येथे स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे शनिवारी सकाळी दहिदुले येथे करण्यात आले. यावेळी परिसर स्वच्छतेसाठी लागणारे सर्व साहित्य मोठ्या प्रमाणावर कृभको नि उपलब्ध करून दिली या वाटप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन श्री दीपक भाऊ मराठे हे होते तसेच प्रमुख पाहुणे श्री कृष्णा पाटील मॅनेजर शेतकरी संघ नंदुरबार, कृभको चे जिल्हा व्यवस्थापक संदीप ढाकणे तसेच प्रमुख उपस्थिती दहिंदुले बुद्रुक गावाचे सरपंच श्री राजेंद्र वळवी उपसरपंच गणेश पाटील दहिंदुले खुर्द चे उपसरपंच श्री देवेंद्र राजपूत संजय पाटील यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले

यावेळी कृभको चे राज्य विपणन व्यवस्थापक श्री जितेंद्र भामरे व नंदुरबार धुळे जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक श्री संदीप ढाकणे यांनी त कृभको तर्फे शेतकरी व शेतकरी पाल्य विद्यार्थी यांच्यासाठी त राबवल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व उपक्रमाविषयी माहिती दिली तसेच जिल्हा परिषद शाळेत गावामधून प्रदक्षिणि फेरी काढणायत आली या वेळी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी शिरसाट मिताली सोनवणे रमेश पावरा कलावती पावरा शिक्षक आणि शिवशंकर विद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षक उपस्थित होते त्यांनी स्वछ गाव स्वछ घर आणि स्वच्छताही सेवा हा संदेश देण्यात आला.

### शब्दकोडे क्रमांक : २४०६



**आडवे शब्द :** १.कर्नाटकची राजधानी ४.राजस्थानमधील ऐतिहासिक प्रदेश ६.भारतीय वंश क्रिकेटपटू राहुल * ९.एक मराठी महिना १०. एक चतुर्थांश हिस्सा ११.ज्योतिषशास्त्राचा एक प्रकार १४.स्वयंपाकासाठी किंवा दिव्यासाठी वापरले जाणारे द्रव १५.घोड १७.शिकार किंवा भक्ष्य१९.कायद्यातील कलम किंवा रोपाची फांदी २१.वाद २४.चव,आस्वाद किंवा लज्जत २६वनवा-उलट लिहा २८. नऊ हा आकडा २९.पहिला मुघल सम्राट ३१.सैन्याला पुरवली जाणारी अन्नसामग्री ३३.गुप्त गोष्ट ३५.धन्यवाद व्यक्त करणे ३६.अति आकर्षण ३९.इंग्रजीत आरशाला म्हणतात तो ४०.सवय किंवा लकब ४१.सौरमालेतील ग्रह किंवा एक वार ४४.पौष्टिक अन्न किंवा पैलवानांचा आहार ४५.डौल, दिमाख किंवा ऐट ४६.वस्तू खरेदी-विक्रीचे ठिकाण४७.निषिद्ध किंवा अप्रामाणिक ४९.बागेची राखण करणारा माळी ५१.६ हा आकडा ५२.होकार ५३.मनन किंवा सखोल विचार करणे ५४.युद्ध, लढाई किंवा संग्राम **उभे शब्द :** १.नाभी २.सांडपाणी वाहण्याची पन्हळ ३.हात किंवा तोंड पुसण्याचे कापड ५.लहान गाव किंवा वस्ती ६.तरल पदार्थ ७.एक लहान आकाराचे चर्मवाद्य १०. पालन करणारे १२.थोर किंवा श्रेष्ठ व्यक्ती १३.हत्यार १५.श्री हरी विष्णूंचा एक बटू अवतार १६.सोने १८.यश २०.पंच २२.डाव्या हाताचा वापर करणारा २३.बाड-उलट लिहा २५.व्यवहार २७.वस्ती ३०.ताकद ३२.पावसाची झड ३४.समीप ३५.देवाचे गुणगान करणारी प्रार्थना ३६.गणपतीचे आवडते खाद्य ३७.एक दाक्षिणात्य अभिनेत्री '*** प्रभू' ४०.विश्रांती ४२.समूहबाजी ४३.घर-हिंदीत ४४.कोंबड्यांचे घरटे ४६.दुसऱ्यांदा ४८.संचार ५०.सखा ५१.सारखा

**शब्दकोडे क्रमांक : २४०५ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धा | क | टा | ■ | ह | त | ब | ल | ■ | ख | ड | क |
| रा | ■ | च | हा | ■ | डा | ■ | हा | व | डा | ■ | द |
| वी | त | ■ | द | व | ■ | का | न | न | ■ | खी | र |
| ■ | स | त | रा | ■ | ओ | ढा | ■ | रा | घू | ■ | दा |
| कं | दी | ल | ■ | मा | वा | ■ | सा | ज | ■ | चै | न |
| ग | ■ | म | ग | र | ■ | रा | त | ■ | मि | त्र | ■ |
| वा | डा | ■ | द | वा | वा | जा | ■ | पं | त | ■ | दे |
| ■ | व | जी | र | ■ | चा | ■ | वि | ■ | वा | ज | वी |
| मे | ■ | व | ■ | तो | ■ | क | वि | ता | ■ | ह | ■ |
| घा | व | ■ | च | क | वा | ■ | ध | ■ | ता | र | क |
| ल | ■ | तु | ■ | डा | य | न | ■ | मो | र | ■ | या |
| य | म | रा | ज | ■ | र | त | न | ■ | पा | ड | स |


## संसार सांभाळून मिळवली पीएचडी

**धुळे, दि.८ -धुळ्याच्या आझाद नगर मुस्लिम नगर परिसरात आपला संसार आणि मुलं व परिवार सांभाळून आणि एका मेडिकल कॉलेजला नोकरी सांभाळून आपल्या परिवाराच्या उन्नती आणि विकासासाठी राजस्थानच्या आर्या मेडिकल कॉलेज जयपुर या युनिव्हर्सिटी मध्ये वैद्यकीय क्षेत्रातील अतिशय उच्च मानत मानल्या जाणाऱ्या फिजिओलॉजी या विषयात अभ्यास करून संशोधनात पीएचडी मिळविणारी धुळ्यातील पहिलीच मुस्लिम समाजातील महिला मानले जात आहे.**



धुळ्याच्या व्यापारी क्षेत्रातील लोखंड बाजारातील प्रसिद्ध व्यापारी हाजी नुरली उस्मान शहा यांची सून व धुळ्याच्या मेडिकल कॉलेजचे विभाग प्रमुख डॉक्टर नवीद शहा यांची पत्नी डॉक्टर शबनम नवीद शहा यांनी फिजिओलॉजी या विषयात पीएचडी मिळवून धुळ्याचे नाव अतिशय चांगल्या शिखरावर नेल्यामुळे डॉक्टर शबनम शहा यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. लग्न झाल्यानंतर शिक्षण हे बऱ्याचशा महिलांच्या डोक्याच्या बाहेर जाते आणि विशेषतः मुस्लिम समाजातील ही महिला वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यास करून एम एस सी पर्यंत शिक्षण घेऊन पुन्हा वैद्यकीय क्षेत्रातील बी एच एम एस यापासून पीएचडी मिळवणारी यशस्वी महिला ठरलेली आहे घरातील सर्व कामे आटपुन मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देऊन शिवाय सदरच्या महिलेने घरातील कुठल्याही कामासाठी नोकर चाकर न ठेवता आपले ही पहिलीच महिला मानले जात आहे तिचे समाजातील सर्वच क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

प्रकाश में आज पहेलीबार




राज कुमार, मिना कुमारी, राजेंद्र कुमार, महेमूद, शोभा, शोभा खोरे, सुंदर










## आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालया शिष्टमंडळाची काश्मीर विद्यापीठाला भेट

**शिरपूर, दि.८(प्रतिनिधी) - आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूरच्या शिष्टमंडळाने काश्मीर विद्यापीठाच्या फार्मास्युटिकल सायन्सेस विभागाला सदिच्छा भेट देत शैक्षणिक, संशोधन आणि संस्थात्मक सहकार्याबाबत सविस्तर चर्चा केली.**

या भेटीदरम्यान युनिव्हर्सिटी ऑफ कश्मीर येथील कार्यरत असलेले फार्मास्युटिकल सायन्स विभागप्रमुख प्रा. सबीहा शाफी, फार्माकॉलॉजी विभागाचे प्रा. गीर मोहम्मद इशाक तसेच फार्मास्युटिक्स विभागप्रमुख प्रा. डॉ. निसार अहमद खान यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली. बैठकीत शैक्षणिक सहकार्य, संयुक्त संशोधन प्रकल्प, प्राध्यापक व विद्यार्थी विकास कार्यक्रम, विद्यार्थी देवाणघेवाण, सांस्कृतिक उपक्रम, उद्योगअभ्यास सहकार्य तसेच परस्पर संस्थात्मक विकास यांसारख्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. दोन्ही संस्थांनी परस्पर सहकार्याच्या माध्यमातून विद्यार्थी, प्राध्यापक आणि संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी संयुक्तपणे कार्य करण्याची तयारी दर्शविली. ही भेट अत्यंत फलदायी ठरली असून भविष्यात दोन्ही संस्थांमध्ये विविध शैक्षणिक, संशोधनात्मक आणि कौशल्य विकासाशी संबंधित उपक्रम राबविण्यासाठी नवे सहकार्याचे मार्ग खुले होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. आर. सी. पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व प्राचार्य डॉ. संजय सुराणा यांनी केले.

## पान १ वरुन

### नंदुरबारात जन आक्रोश मोर्चाला परवानगी नाकारली

जिल्ह्यात शांतता व कायदा-सुव्यवस्था कायम राखण्यासाठी प्रशासन आवश्यक ती सर्व उपाययोजना करत असल्याचे सांगितले.

दरम्यान, या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांच्या तत्परतेमुळे परिस्थिती नियंत्रणात असून शहरातील जनजीवन सुरळीत सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

### अमेरिकेचा इराणचे परस्पर विरोधी हल्ले; शस्त्रसंधी संपुष्टात

सूट रद्द करण्यात आल्याचे म्हटले आहे. या घोषणेमुळे भारतीय शेअरबाजारात घसरण झाली आणि गुंतवणूकदारांचे आठ लाख कोटी रूपये बुडाल्याची भिती व्यक्त होत आहे.

इंधन दर वाढण्याची शक्यता

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी इराणसोबतची शस्त्रसंधी संपल्याचे जाहीर करताच भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. भारतीय शेअर बाजारात आज गुंतवणूकदारांचे ८ लाख कोटी रुपये बुडालेत. इराणचे तेल आंतरराष्ट्रीय बाजारात आल्याने क्रूड ऑईलचे दर कमी होतील, असा अंदाज भारताचा होता. इराणचे तेल बाजारात आले असते तर देशातील पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी झाले असते. मात्र, आता इराणचा परवाना अमेरिकेने रद्द केल्याने ती आशा संपली आहे. तज्ज्ञांच्या मते पुढील ४८ तासांमध्ये स्थिती सुधारली नाही तर क्रूड ऑईलचे दर ८०-८५ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचतील. भारत एकूण गरजेच्या ८५ टक्के तेल आयात करत असल्याने भारतात देखील इंधनाचे दर महाग होऊ शकतात. भारताला यामुळे विदेशी चलन मोठ्या प्रमाणावर क्रूड ऑईल खरेदीसाठी मोजावे लागेल.

### कचऱ्याच्या ढीगाखाली पंधरा जण अडकलेत

प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मोशी येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात ही घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, सलग पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे लेगसी वेस्टचा प्रचंड ढिगारा सैल झाला आणि तो लगतच्या प्रशासकीय इमारतीवर घसरून आला. या धडकेमुळे इमारतीचा मोठा भाग कोसळला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक तसेच एनडीआरएफची पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी जेसीबी, क्रेन आणि अत्याधुनिक उपकरणांच्या मदतीने बचावकार्य सुरू आहे. काही माध्यमांच्या वृत्तानुसार, ढिगाऱ्याखालून आवाज ऐकू येत असल्याने बचाव पथकांकडून शोधमोहीम सुरू आहे. दुर्घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी झाली असून प्रशासनाने नागरिकांना घटनास्थळापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलविण्यासाठी रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. अद्याप मृत्यू किंवा जखमींचा अधिकृत आकडा जाहीर करण्यात आलेला नाही.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि नदीपात्रांच्या पाणीपातळीत वाढ होणे अशा घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा मोठा ढिगारा इमारतीवर घसरून आल्याने ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुरुवातीला दहा जण अडकल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर काही अधिकृत माहितीनुसार आता सुमारे चौदा ते पंधरा कर्मचारी अडकल्याची शक्यता सांगण्यात आली असून आकडा अद्याप बदलू शकतो. घटनास्थळी अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, पोलीस आणि इतर बचाव पथके दाखल झाली असून बचावकार्य सुरू आहे. अडकलेल्या व्यक्तींची नेमकी संख्या आणि त्यांची प्रकृती याबाबत अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही.

### धरणातून पाणी सोडले नसतांना गोदावरीला पूर

गौतमी-गोदावरी परिसरात १२१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हवामान खात्याने नाशिकच्या घाटमाथा परिसरासाठी मयलो अलर्टफ जारी केला आहे. पुढील काही तास शहरात ताशी २० ते ३० किमी वेगाने वारे वाहण्याची आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार ते मध्यम सरी कोसळण्याची शक्यता आहे. आज दिवसाचे कमाल तापमान २५ अंश सेल्सिअस तर हवेतील आर्द्रता ९३% राहण्याचा अंदाज आहे. प्रशासनाने नदीकाठच्या गावांना आणि सखल भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून, सुरक्षित स्थळी राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास महापालिकेच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे.

### पिंपळनेर जवळ टँकर मधून गॅस

पंकज वाघ, दावल सैदाणे यांनी मंगळवारी मध्यरात्री कारवाई केली. बालाजी हॉटेलच्या मागील परिसरात पेट्रोलियम गॅस टँकर सह तीन जीपमध्ये मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक सिलेंडर आढळले. गॅस टँकर मधून अवैधरित्या गॅस काढून तो व्यावसायिक सिलेंडरमध्ये भरणा करणे, काळ्या बाजारात विविध ठिकाणी विक्रीसाठी रवाना करणे असा उद्योग या ठिकाणी सुरू असल्याचे कारवाईतून स्पष्ट झाले. व्यावसायिक हॉटेलांना मोठ्या प्रमाणात पुरवठा करणा-या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे.

**सिलेंडर, वाहने जप्त**

पथकाने घटनास्थळावरून एलपीजी गॅसचे १०५ सिलेंडरचा अवैध साठा, भारत पेट्रोलियमचा गॅस टँकर (केए ०१/ एई-३६५), जीप (जीजे-१९/वाय-८३१६), महिंद्रा बोलेरो (जीजे०६/एयू३६६२), मारुती सुझुकी (एमएच१८/बीजी-८६६७), गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य, वीज पंप, पाईप, उपकरणे व इतर साहित्य जप्त करण्यात आली.

**सर्व संशयित पसार**

पोलिसांसह पथक कारवाईसाठी येत असल्याची कुणकुण लागताच घटनास्थळावरून वाहन चालक, सहचालक अंधाराचा फायदा घेत पसार झाले. पोलिसांनी विविध ठिकाणी शोध घेतला पण कोणीही सापडू शकले नाही. चौकशीअंती लवकरच संशयितांची नावे निष्पन्न होतील. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, या रॅकेट मधील आरोपींसह मुख्य सूत्रधारांचाही शोध घेणे महत्त्वाचे आहे. त्यात पोलीस प्रशासनाला किती यश येते ते लवकरच दिसेल.

**८३ लाखांचा मुद्देमाल जप्त**

विशाल कांगणे यांनी फिर्याद दिली, त्या नुसार कारवाई मध्ये अशोक लेलंड कंपनीचा भारत पेट्रोलियम कंपनीचा पांढरा रंग असलेला टँकर (केए०१/एइ् ६३६५) मालक पी. नटराजन पलानीसामी (आर.सी.बुकवर नमुद केलेनूसार नाव), वाहन चालक (नाव माहित नाही), मारुती सुझुकी कंपनीचा सुपर कॅरी (छोटा हत्ती) (एमएच-१८-बीजी-८६६७) चे वाहन मालक व चालक (नांव माहित नाही), बोलेरो पिक अप (जीजे-१९-वाय-८३१६) वाहन मालक व चालक (नांव माहित नाही), बोलेरो पिक अप (जीजे-०६-एयु-३६६२) मालक व चालक (नांव माहित नाही), भरत चौधरी (रा. धुळे), पारस जैन, महारु चंदू ठाकरे (गोपी), मनिषभाई (बारडोली) यांनी अशी कृती करुन जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रिब्यूशन) ऑर्डर २००० मधील कलम २ मधील पी, कलम ३ मधील उपलकम १, कलम ४ मधील उपकलम १ मधील बी, सी, कलम ७ मधील उपकलम १ मधील ए, बी, सी या तरतुदींचा भंग केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांचे विरुध्द पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ८३ लाख ३५ हजार ७४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

### हनुमंत गायकवाड आज कार्यभार घेणार

मितभाषी मात्र कर्तव्यनिष्ठ व कायद्याचे पालन करणारे अधिकारी म्हणून गायकवाड यांची विदर्भात ओळख आहे. त्यांनी विदर्भातील यवतमाळ, गडचिरोली, अमरावती, भंडारा जिल्ह्यात काम केलेले आहे.

### अल्पवयीन मुलीशी लग्न पाच जणांवर गुन्हा दाखल

पवार, संगीताबाई गुलसिंग पवार, नवरदेव बहिरम गुलसिंग पवार यांच्याविरोधात बालविवाह कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला.

## पान १ वरुन

### नगराध्यक्षांना वित्तीय अधिकार द्यावे

मध्ये महाविकास आघाडीचे सरकारचा काळात हा अधिकार काढून घेण्यात आला.आज राज्यभरात नव्वद टक्के नगरपरिषदा या महायुतीच्या ताब्यात आहेत त्यामुळे आता शासनाने नगराध्यक्षांना यांच्या अधिकार देण्याच्या निर्णयाच्या फेरविचार करायला पाहिजे.

**न्यायालयाचा दिला दाखला**

दि.३०. जुलै २०२६ रोजीच्या संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या निकालाचा देत आ. चंद्रकांत रघुवंशी म्हणाले,नंदुरबार जिल्ह्यातील नगराध्यक्ष संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या खंडपीठात गेली असता. त्यांना चेकवर सही करण्याचा अधिकार आणि ६४ नंबरच्या फॉर्मवर सही करण्याच्या अधिकार न्यायालयाने दिला. या संदर्भात नंदुरबारचा जिल्हाधिकाऱ्यांना खंडपीठाने आदेशित केले. या निकालाच्या अनुषंगाने नगराध्यक्षांना धनादेशांवर स्वाक्षरी करण्याचे अधिकार बहाल करावेत.

### उ. महा.खान्देश विकास मंडळ संचलित

नाशिक येथे सकाळी ९.३० वाजता होणार आहे. या पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे हे राहणार असून आमदार सौ सीमाताई हिरे यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उदघाटन होणार आहे.

या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या पुरस्कार समितीच्या बैठकीत हे पुरस्कारार्थी निवडण्यात आले . पुरस्कार निवड समितीत डॉ.फुला बागुल, बापूसाहेब पिंगळे, डॉ. नरेंद्र खैरनार, पी.झेड.कुवर, लतिका चौधरी यांचा समावेश होता. अहिराणी साहित्याचा गौरव करणाऱ्या या संमेलनाकडे आता संपूर्ण खानदेशाचे लक्ष लागले आहे. तरी अहिराणी रसिक, प्रेक्षक, साहित्यिक व भाषा प्रेमी यांनी या सोहळ्यास व रिमझिम अहिराणी काव्य संमेलनास उपस्थित राहून आम्हास उपकृत करावे, असे आवाहन अध्यक्ष विकास पाटील, कार्याध्यक्ष प्राचार्य प्रशांत पाटील, सहकार्याध्यक्ष डॉ. एस.के. पाटील, बापू हटकर, अर्जुन पाटील आप्पा, दीपक पाटील, डॉ.फुला बागुल, बापूसाहेब पिंगळे, डॉ. नरेंद्र खैरनार, प्रमोद कुवर, लतिका चौधरी, विनायक पवार, प्रा. प्रकाश माळी यांनी केले आहे.

### धुळ्यासह राज्यात फोफावला संघटीत लँड जिहाद

बिहारमधील बेगुसराय येथील प्लॉटची मिळकत पत्रिका शेतजमिनीचा पुरावा म्हणून सादर करणे, बनावट वारस दाखवून व्यवहार करणे, मूळ मालकाने संपूर्ण जमीन विकल्यानंतर पुन्हा वारस उभे करून त्याच जमिनीचे व्यवहार करणे, सरकारी जमिनींची नोंद असतानाही त्या जमिनींची खरेदी-विक्री करणे, बनावट व्यक्ती उभ्या करून दस्त नोंदणी करणे, न्यायालयाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा अत्यल्प किमतीवर दस्त करून शासनाचा मुद्रांक महसूल बुडविणे, तसेच शेतकरी नसताना बोगस कागदपत्रांच्या आधारे कृषी जमिनींची खरेदी-विक्री करणे असे गंभीर प्रकार समोर आले आहेत. याशिवाय, अशा जमिनींवर बँकांचे कर्ज घेणे आणि संपूर्ण साखळी पद्धतीने हे व्यवहार राबविणे ही बाब अत्यंत गंभीर असून, त्यामागे संघटित स्वरूपाचे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शासनाची मोठ्या प्रमाणात फसवणूक**

या सर्व व्यवहारांची पद्धतशीर चौकशी झाली तर शासनाची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याचे, महसूल बुडविण्यात आल्याचे तसेच महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाचा गैरवापर झाल्याचे स्पष्ट होईल. या प्रकरणांमध्ये काही विशिष्ट समाजातील व्यक्तींनी कायद्याचा गैरफायदा घेतल्याचे आरोप असून, या प्रत्येक व्यवहाराची निष्पक्ष, पुराव्यावर आधारित चौकशी होणे आवश्यक आहे.

**धुळे शहर, तालुक्यातील गैरप्रकाराची प्रकरणे**

धुळे शहर तथा शहरालगतच्या तालुक्यातील काही गावांत विशिष्ट समाजाच्या लोकांनी जमिनी बळकावण्याच्या हेतूने शेतकरी नसतानाही शेतकरी असल्याचे बेकायदेशीर पुरावे जोडून जमिनी लाटल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्र कुळ कायदा जमीन नियम क्रमांक कलम चे उल्लंघन झाले आहे. यातून शासनाच्या महसूल कराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये धुळे महापालिकेच्या मालकीच्या नगररचना योजना क्रमांक एकमधील फायनल प्लॉट नंबर ५७ या जागेवर महापालिकेला न विचारता एका विशिष्ट व्यक्तीचे नाव लावण्यात आले व हे नाव लावताना महापालिकेच्या नावाला कंस करण्यात आले. हा देखील मोठा गैरव्यहार असून, ही नोंद करणाऱ्या अधिकाऱ्याला तत्काळ निलंबित करून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी. अशी मागणी आ.अग्रवाल यांनी केली.

**राज्यभरातील प्रकरणांची चौकशी करू : मंत्री बावनकुळे**

आमदार अग्रवाल यांच्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना राज्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले, की राज्यात एखादी जमीन घ्यायची असेल, तर तो शेतकरी असावा, असा कायदा आहे. मात्र शेतकरी नसतानाही शेतजमीन खरेदीचे अनेक प्रकार राज्यभरात सुरू आहेत. यात राज्याबाहेरून आलेल्या अनेक जणांनी या शेतजमिनी विकत घेतल्या आहेत. शासन या बाबत जमाबंदी आयुक्तांमार्फत तपासणी करत असून, यासाठी मोहीमही सुरू करत आहोत. यातून राज्यातील व राज्याबाहेरील शेतकरी नसताना किती जमिनींची खरेदी-विक्री झाली आहे, याची चौकशी केली जाईल. मुद्रांक अधिकाऱ्यांनाही खरेदी-विक्रीची नोंद करताना राज्यात अथवा राज्याबाहेरही खरेदीदाराची कुठे जमीन आहे का, याचा डेटा मिळणार आहे. त्यानुसार अशा गैरप्रकारांना आळा घातला जाईल. तसेच यातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.

### पुनरिक्षणाच्या कामात शहर पो. गुन्हा दाखल

पुनरिक्षणासाठी आवश्यक असलेल्या अर्जाचे (फॉर्म) वाटप करण्याचे काम त्यांच्या लॉगिनवर उपलब्ध आहेत. परंतु त्यांनी सात जुलै २०२६ दुपारी चारनंतर हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले. कामाबाबत टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आले, या आशयाची तक्रार पाटबंधारे विभागाचे वरिष्ठ लिपिक बळवंत खुशाल गांगुर्डे यांनी दिली. त्यानुसार धुळे शहर पोलीस ठाण्या लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० चे कलम ३२, भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १९९ व २०१ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तन) नियम, १९७९ मधील नियम ३ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमांतील संबंधित तरतुदींनुसार रमाकांत देसले यांच्याविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार व्ही. बी. वाडीले तपास करीत आहेत.

### राम मंदिर दानपेटीतील चोरीच्या निषेधार्थ

सुनील सोनार ,जिल्हा सचिव दिनेश सोनवणे, युवा सेनेचे उपजिल्हा प्रमुख दिनेश भोपे, जिल्हा सचिव अक्षय श्रीखंडे ,व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बापू महाजन,किसान सेना आघाडीचे जिल्हाअध्यक्ष महेंद्र राजपूत ,दिनेश चौधरी, रोहित मराठे ,शेरा काझी, शहर संघटक भक्तवत्सल सोनार आयान खाटीक, प्रभाकर गुरव यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी तसेच रामभक्त हिंदू बांधव उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी चोरी करणाऱ्या आरोपींचा जोरदार निषेध नोंदवला. तसेच केंद्र व राज्य सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली. प्रभू रामांच्या मंदिराची सुरक्षा वाढवण्याची आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख पंडित माळी म्हणाले की, भाजप सरकार प्रभू श्रीरामाच्या नावावर २०१४ पासून सत्तेत आहे ,परंतु भाजप सरकार प्रभू श्रीरामाचे संरक्षण करू शकत नाही ते देशाचे व जनतेचे रक्षण काय करतील यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा ,उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस हे एक शब्द बोलत नाही आहे. चोरी प्रकरणी भाजपचा संबंध असावा यात शंका नाही. राम मंदिर ही केवळ इमारत नाही तर कोट्यवधी हिंदूंची आस्था आहे. अशा पवित्र स्थळी चोरी होणे ही निंदनीय बाब आहे. सरकारने याला गांभीर्याने घेऊन आरोपींवर लवकरात लवकर कारवाही करावी असे सांगितले.

## पान १ वरुन

### धुळ्यात कागदपत्रे नसतांना लाखोंची

संबंधितांकडे या वाहनांच्या मालकीचा कोणताही पुरावा, कागदपत्रे आढळली नाहीत. त्यामुळे वाहने अवैधरित्या ताब्यात ठेवल्याचे आढळले. हवालदार आरिफ रमजान पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार महंमद अत्ताउल्लाह अस्लम खान याच्याविरुद्ध मोहाडी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी सर्व वाहने जप्त केली. पोलीस निरीक्षक शिल्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सचिन वाघ तपास करीत आहेत.

### शहादा न.पा सभागृहाची दुरवस्था

आहे. दस्तुरखुद्द नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी ज्या सभागृहात बसतात, तिथल्याच पडक्या व्यवस्थेकडे त्यांचे लक्ष जात नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पालिकेच्या कै.का.स.पाटील सभागृहाच्या छताचे पीओपी मध्यभागीच तुटून पडले आहे.त्यातच पावसाळ्याचे दिवस असल्याने छतातून होणाऱ्या गळतीमुळे सभागृहाच्या भिंती खराब झाल्या आहेत. भिंतीचे रंगकाम निघून गेल्यामुळे हे सभागृह जुनाट दिसत आहे. पालिकेचे हे वैभव असताना या मुख्य ठिकाणाकडे विद्यमान लोकनियुक्त नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांच्यासह मुख्याधिकारी साजिद पिंजारी व पालिका प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.या सभागृहात बसण्यासाठी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्यासाठी उंचावर आसन व्यवस्था आहे तर दोन्ही बाजूस सत्ताधारी व विरोधी बाकांवरील नगरसेवकांसाठी गोलाकार टेबल आहेत. सदस्यांना बसण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात प्लास्टिकच्या खूर्च्या टाकल्या जातात.सभागृहात उर्वरित व्यवस्थेचा पुरता बोजवारा उडाला आहे.नगरसेवकांना सभागृहात बसण्यासाठी पालिकेकडून पुरेशी आणि सन्मानजनक व्यवस्था करण्यात आलेली नाही.तसेच विविध विषय समित्यांच्या सभापतींना पालिकेत स्वतंत्र केबिन तर दूरच पण संबंधित विभागात साधी खुर्चीची व्यवस्थाही पालिकेने केलेली नाही.यामुळे लोकप्रतिनिधींमध्ये तीव्र नाराजीचा सूर आहे.लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांसाठी स्वतंत्र प्रेस गॅलरी किंवा बैठक व्यवस्था नाही. सभागृहाच्या भिंतीला लागून एका रांगेत तात्पुरत्या प्लॅस्टिकच्या खुर्च्या ठेवून पत्रकारांची बैठक व्यवस्था केली जात आहे.सर्वसाधारण सभेसाठी पालिकेच्या अधिकाऱ्यांना ऐनवेळी मध्यभागी खुर्च्या टाकून बसावे लागते.ज्या सभागृहातून संपूर्ण शहादा शहराच्या स्वच्छतेचे आणि देखभालीचे नियम ठरवले जातात तेच सभागृह जर तुटलेल्या पीओपी आणि खराब भिंतींच्या छायेत असेल तर पालिकेचा कारभार कसा चालणार? स्वतः नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी दर बैठकीला या छताखाली बसतात तरीही त्यांचे लक्ष याकडे जाऊ नये यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी आतातरी याकडे गांभीर्याने पाहून सभागृहाचा कायापालट करावा अशी अपेक्षा व्यक्त मागणी केली जात आहे.

**ड्रायव्हर पाहिजे**
शाळेच्या स्कूल बस साठी अनुभवी रिटायर एसटी ड्रायव्हर पाहिजे
संपर्क साधा होरायझन इंग्लिश स्कूल धुळे
मो. 8698524455

### बोरविहीर टोल संदर्भात मराठा समाजाचे निवेदन

**धुळे, दि. ८ (प्रतिनिधी) - धुळे तालुक्यातील बोरविहीर टोलनाक्यावरील वादानंतर सकल मराठा समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. टोलवरील कर्मचाऱ्यांची माजी आमदार शरद पाटील यांच्याशी झालेली आरेरावी आणि मानहाणीविरोधात समाजातर्फे आज जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. माजी आमदार शरद पाटील यांचा व्हिडीओ व्हायरल करण्याच्या प्रकाराचाही त्यांनी निषेध केला.**

निवेदनात म्हटले आहे, बोरविहीर टोलनाक्यावरील अनेक कर्मचारी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आणि गुंड प्रवृत्तीचे आहेत. हे कर्मचारी वारंवार सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि नेत्यांना दमदाटी करतात. शिवीगाळ करतात आणि मारहाण करतात. माजी आमदार शरद पाटील यांच्यासोबत झालेला वादाचा व्हिडीओ देखील हेतुपुरस्कर बदनामीच्या उद्देशाने प्रसारीत करण्याचा दावा करण्यात आला आहे. टोलनाक्यावरील वरील सर्व कर्मचाऱ्यांची पोलिस यंत्रणेमार्फत पडताळणी करण्यात यावी, या मुख्य मागणीसह अन्य मागण्या निवेदनात नोंदविण्यात आल्या आहेत. निवेदन देताना सुधाकर बेंद्रे, भानुदास बगदे, विनोद जगताप, राजेंद्र काळे, देवेंद्र पाटील, अतुल सोनवणे, राजेंद्र मराठे, किशोर वाघ, मनोज ढवळे, आबा कदम, भानुदास चौधरी, राजेंद्र कोतेकर, सुधीर मोरे, वामन मोहिते, प्रफुल्ल माने, दिलीप पाटील, सरपंच बाळासाहेब शुभम पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव उपस्थित होते.

### शबरी महामंडळाचे कर्ज माफ करा

नंदुरबार, दि.८ - शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना शेतकऱ्यांप्रमाणे संपूर्ण कर्जमाफी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी शिवसेना आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी विधान परिषदेत केली.

सन २००९ च्या निवडणुकीपूर्वी जाहीर झालेल्या कर्जमाफीत लाभार्थ्यांचे केवळ व्याज माफ करण्यात आले होते. मात्र, मूळ कर्ज आजही सातबाऱ्यावर कायम असल्याने हजारो अनुसूचित जमातीचे लाभार्थी आर्थिक अडचणीत आहेत, असे त्यांनी सभागृहात सांगितले.

हार्दिक अभिष्टचिंतन !

सदस्य कार्यकारीणी – धुळे वकील संघ
खजिनदार – छ.संभाजी महाराज स्मारक, धुळे
जिल्हाउपाध्यक्ष– छावा संघटना
ॲड.नितिन पंडीतराव पाटील
यांना वाढदिवसाच्या लाख–लाख
हार्दिक शुभेच्छा!
–: शुभेच्छूक :–
ॲड.दिनेश का.काळे (जिल्हा व सत्र न्यायालय धुळे)
संस्थापक अध्यक्ष– श्री स्वाती समर्थ गणेश मंडळ शिवाजीरोड धुळे

**REQUIREMENT**
Ekdanta Spinning Pvt. Ltd. Invites applications from qualified, experienced and result-oriental professional to join our growing organization for the following positions.
(An Upcoming Spinning Mill at Dhule)
- Electrical Engineer
- Mechanical Engineer
- BSC Graduate
- ITI Electrical Trainee

Candidate who are passionate about professional growth and wish to be part of a progressive textile organization are encouraged to apply.
Walk-in interview Date on 09/07/2026 & 10/07/2026.
EKDANTA SPINNING PVT. LTD.
GUT NO. 65, MUMBAI-AGRA ROAD.
BEHIND LUXYLE SHOEROOM, DHULE
Email: hr@ekdantaspinning.com
Contact: 8669988654

**किडनी रोग तज्ञ**
डॉ.ललित देसले
डी एम (नेफ्रॉलॉजिस्ट) किडनी रोग तज्ञ
– ओपीडी वेळ –
सकाळी – १० ते २
संध्याकाळी– ४ ते ६
ठिकाण –
ओम हॉस्पिटल, अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे.
– संपर्क –
02562-241313, 283318
9881116734
9890038308

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
–: संपर्क :–
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**फ्लॅट भाड्याने देणे**
वाखारकर नगर जवळ शिवमहिमा अपार्टमेंट मधील 1 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
अरुण केशव भडांगे
9823118941

**Requirements:**
Position : District Sales & Marketing Executive
- Experience in AAC Blocks/Construction Material/Cement Industry
- Own Two-Wheeler & Valid Driving Licence
- Strong Sales & Customer Handling Skills
- Ability to Achieve Sales Targets
Location : Dhule District
Salary : Attractive+Incentive
Contact/WhatsApp: 9226817232

**Wanted**
- Kitchen Staff
- Cashiers
- Riders
La Pino'z Pizza
Nehru Nagar, Wadibhokar Road, Deopur, Dhule.
9099353456

**पाहिजेत**
कलर दुकानासाठी बिल बनवण्याकरीता मुलगी/महिला पाहिजेत.
बाबजी पेंटस्
देवपूर, धुळे
9730255252
8766771033

**जागा विकणे आहे**
भरत नगर फ्लॅट नं.९
साईज ३६५० स्क्वे. फूट विकणे आहे
-: संपर्क :-
9422775491

**पाहिजेत**
कामासाठी पाहिजे
सेल्समन – २
सेल्सगर्ल – २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

५९ वर्षापासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
Japan Premium

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV HDB FINANCIAL SERVICES
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०